ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ओरछा (मध्यप्रदेश)येथील जहांगीर महलाचा वास्तुशास्त्रीय अभ्यास



वृषसेन विनायक धनके

## प्रस्तावना

जहांगीर महल, ओरछा (मध्य प्रदेश) हे भारतीय स्थापत्य परंपरेतील एक अत्यंत महत्वाचे स्मारक आहे. या लेखात या महलाचे वास्तुशास्त्रीय मूल्य, स्थापत्यशैली, नकाशीय रचना, प्रांगण व्यवस्था, प्रकाश आणि वायुप्रवाह, जलस्रोत, तसेच पर्यावरणीय घटक यांचा सखोल अभ्यास केला आहे. हिंदू (राजपूत) व मुगल स्थापत्यशैलींचा संगम वास्तुशास्त्रीय दृष्टिकोनातून कसा संतुलित आहे, हे या लेखातून स्पष्ट केले आहे. या अभ्यासामुळे जहांगीर महलाचा भारतीय स्थापत्य व वास्तुशास्त्रातील स्थान अधोरेखित होते.ओरछा हे मध्य प्रदेशातील टिकमगढ जिल्ह्यातील एक ऐतिहासिक नगर आहे, जे मध्ययुगीन काळापासून ओळखले जाते. ओरछा हे गाव प्राचीन किल्ले, राजवाडे, मंदिरे आणि प्राकृतिक सुंदरतेने भरलेले आहे. हे गाव नैसर्गिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या विकसित झालेले आहे.

ओरछा हे गाव बेतवा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे, ज्यामुळे त्याची प्राकृतिक सुंदरता मोठ्या प्रमाणात आहे. ओरछा हे ठिकाण मध्य प्रदेशातील उत्तर पश्चिम विभागात आढळते. आजूबाजूचा प्रदेश डोंगराळ आणि उंच पर्वतरांगामुळे एक मोहक आकर्षक रचना निर्माण करणारा आहे.

ओरछा गावाचा इतिहास पाहता, सोळाव्या शतकापासून या ठिकाणी बुंदेल राजा रुद्रप्रताप सिंह यांनी या ठिकाणचे वास्तव्य विकसित केले आणि या काळात एक सांस्कृतिक वारसा विकसित करण्याचे कार्य बुंदेल घराण्याणे केलेले पाहावयास मिळते.

ओरछा हे ठिकाण त्याच्या ऐतिहासिक महत्वामुळे आणि प्राकृतिक सुंदरतेने भरलेले असल्यामुळे पर्यटनासाठी एक प्रमुख आकर्षण आहे.

भारतीय स्थापत्य परंपरा हा मानवी जीवन, निसर्ग आणि ऊर्जा संतुलन यांचा सुसंवाद आहे. प्राचीन भारतीय वास्तुशास्त्रानुसार, प्रत्येक वास्तू ही केवळ भौतिक रचना नसून ती जीवन सत्त्वावर, आरोग्यावर आणि मानसिक संतुलनावर प्रभाव टाकते. वास्तुशास्त्रातील प्रमुख तत्त्वांमध्ये दिशा, प्रकाश, वायुप्रवाह, जलस्रोत, भूमीस्वभाव, तसेच परिसराचा नैसर्गिक आणि सामाजिक घटक यांचा समतोल साधणे हा समाविष्ट आहे. या दृष्टिकोनातून मध्य भारतातील ओरछा येथील जहांगीर महल एक आदर्श नमुना मानला जातो.[1]

जहांगीर महलाची निर्मिती सतराव्या शतकाच्या सुरुवातीस बुंदेला वंशातील राजा वीर सिंह देव यांनी केली. हा महल मुगल सम्राट जहांगीर यांच्या ओरछा भेटीच्या सन्मानार्थ उभारण्यात आला. त्या काळातील राजपूत-मुगल संबंधांचा अभ्यास केल्यास, हा महल केवळ स्वागतासाठी नव्हे तर राजकीय सामंजस्य, सत्ता संतुलन आणि सांस्कृतिक संवादाचे प्रतीक असल्याचे स्पष्ट होते. यामुळे त्याचा ऐतिहासिक महत्त्व वाढते.[2]

## मुघल कालीन वास्तुकलेची वैशिष्ट्ये:

**१. मुगल शैली :** वास्तुकला मुख्यतः मुगल शैलीवर आधारित होती, ज्यामध्ये भारतीय आणि पर्शियन शैलीचा समावेश होता.

**२. लाल दगडाचा वापर :** मुघल वास्तुकलेमध्ये लाल दगडाचा वापर केला जात असे, ज्यामुळे इत्यादी वास्तू भव्य आणि आकर्षक दिसत.

**३. हिंदू आणि एशियाई वास्तुकलेचा मिश्रण:** अकबर कालीन वास्तुकलेमध्ये हिंदू आणि एशियाई वास्तुकलेचा उत्कृष्ट मिश्रण पहावयास मिळते

**४. भव्य आणि मोठे दरवाजे :** मुघलकालीन वास्तुकलेमध्ये भव्य आणि मोठे दरवाज्याचा वापर केला जात असे, जे एक भव्य आणि आकर्षक प्रवेशद्वार बनत होते

**५ गोल आकार :** अकबर कालीन वास्तुकलेमध्ये गोल आकाराचा वापर केला जात असे, ज्यामुळे इत्यादी वास्तू भव्य आणि आकर्षक दिसत.

मुघलकालीन वास्तुकलेने भारतीय वास्तुकलेला एक नवीन दिशा दिली

## नकाशीय रचना आणि वास्तुशास्त्र

जहांगीर महलाची नकाशीय रचना चौकोनी असून, वास्तुशास्त्रातील 'वास्तुपुरुष मंडल' संकल्पनेशी सुसंगत आहे. चौकोन हा स्थैर्य, सममिती आणि सुरक्षिततेचे प्रतीक मानला जातो. महलाच्या मध्यभागी असलेले प्रशस्त प्रांगण (ब्रह्मस्थान) संपूर्ण वास्तूला ऊर्जा संतुलन प्रदान करते. प्रांगणामुळे नैसर्गिक प्रकाश आणि वायुप्रवाह संपूर्ण महलात वितरित होतो, ज्यामुळे अंतर्गत वातावरण आरोग्यदायी व संतुलित राहते.[3] महलाच्या प्रत्येक खोलीची योजना विशिष्ट कार्यानुसार करण्यात आली आहे. शयनकक्ष, सभागृह, भव्य बरामदे, तसेच सार्वजनिक आणि खासगी प्रांगण यांचा समन्वय या रचनेतून दिसतो. प्रत्येक खोलीतील खिडक्या आणि दरवाजे यांचा दिशा-निर्णय वास्तुशास्त्रीय नियमांनुसार करण्यात आला आहे, जेणेकरून प्रकाश, वायुप्रवाह आणि ऊर्जा प्रवाहात संतुलन राखता येईल.[4]

## प्रवेशद्वार आणि दिशा

मुख्य प्रवेशद्वार पूर्व दिशेकडे उघडते. पूर्व दिशा ही सूर्यप्रकाश, सकारात्मक ऊर्जा आणि जीवनशक्तीची दिशा आहे. वास्तुशास्त्रानुसार पूर्वाभिमुख प्रवेशद्वार असलेली वास्तू समृद्धी व सकारात्मक उर्जा निर्माण करते. दक्षिण-पश्चिम भाग अधिक भक्कम ठेवण्यात आला असून तो स्थैर्य व सत्तेचे प्रतीक आहे, तर उत्तर व पश्चिम बाजूंवर मोकळ्या जागा आणि जाळीदार खिडक्या ठेवण्यात आल्या आहेत, जे वायुप्रवाह आणि प्रकाश यांचा संतुलन राखतात.[5]

## प्रांगण व्यवस्था आणि वातानुकूलन

महलाच्या मध्यभागी प्रशस्त प्रांगण असून, त्याभोवती बरामदे व खुले प्रांगण आहेत. या रचनेमुळे नैसर्गिक वायुप्रवाह सुनिश्चित होतो, तसेच उष्ण हवामानात थंडावा टिकवता येतो. जाळीदार खिडक्या सौम्य प्रकाश देतात, थेट सूर्यप्रकाश न येऊ देता अंतर्गत जागा प्रकाशित राहते. छत उंच ठेवण्यात आलेले असून, उष्णता वरच्या भागात संचित होऊन खोलीतून बाहेर जाते. ही रचना पर्यावरणपूरक, शाश्वत आणि ऊर्जा-संवर्धक आहे.[6]

## जलस्रोताचा महत्त्व

जहांगीर महल बेतवा नदीच्या काठावर वसलेला आहे. वास्तुशास्त्रानुसार जलस्रोताजवळील वास्तू समृद्धी, आरोग्य आणि मानसिक शांतता प्रदान करते. नदीमुळे परिसरात नैसर्गिक थंडावा, आर्द्रता आणि

सकारात्मक ऊर्जा टिकून राहते. महल आणि निसर्ग यांच्यातील सुसंवाद भारतीय स्थापत्य परंपरेतील 'निसर्गाशी सुसंगती' या मूलभूत तत्त्वाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.[7]

## स्थापत्यशैलीचा संगम

जहांगीर महलात हिंदू (राजपूत) व मुगल स्थापत्यशैलीचा संगम दिसतो. मुगल स्थापत्यातील सममिती, गुंबद, जाळी व अलंकरण यांसोबतच राजपूत स्थापत्यातील चहात्री, कंगोरे व भक्कम भिंती यांचा योग्य वापर आहे. हा स्थापत्यसंयोग सौंदर्यदृष्ट्या तसेच वास्तुशास्त्रीय दृष्ट्या संतुलित आहे. विविध स्थापत्य परंपरांचा संगम ऊर्जेच्या प्रवाहात संतुलन निर्माण करतो.[8]

## सांस्कृतिक व पर्यावरणीय महत्त्व

जहांगीर महल हे केवळ ऐतिहासिक स्मारक नाही; तो वास्तुशास्त्र, स्थापत्यशास्त्र व सांस्कृतिक अभ्यासासाठी एक महत्वपूर्ण संदर्भबिंदू आहे. पर्यटन आणि वारसा संवर्धनासाठीही महत्त्व आहे. महलाच्या रचनेत नैसर्गिक घटकांचा समावेश केल्यामुळे पर्यावरणीय शाश्वतता राखली गेली आहे.[9]

## निष्कर्षात्मक निरीक्षणे

- महलाची चौकोनी रचना वास्तुशास्त्रातील स्थैर्य व समतोलाचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.
- मध्यभागी असलेले प्रांगण (ब्रह्मस्थान) ऊर्जा संतुलन साधते.
- पूर्वाभिमुख प्रवेशद्वार सूर्यप्रकाश व सकारात्मक ऊर्जेचा लाभ देतो.
- जाळीदार खिडक्या, बरामदे व उंच छत नैसर्गिक वातानुकूलन सुनिश्चित करतात.
- बेतवा नदीच्या सान्निध्यामुळे वास्तू आणि निसर्ग यांच्यात सुसंवाद आहे.
- हिंदू-मुगल स्थापत्यशैलीचा संगम वास्तुशास्त्रीय संतुलन टिकवतो.
- महल आधुनिक स्थापत्य अभ्यासासाठी प्रेरणादायी आणि शाश्वत आहे.
- पर्यटन, सांस्कृतिक अभ्यास आणि वारसा संवर्धनासाठी महत्त्वाचे ठिकाण आहे.

## निष्कर्ष

- जहांगीर महल हा केवळ ऐतिहासिक स्मारक नाही तर भारतीय वास्तुशास्त्राचा प्रत्यक्ष अविष्कार आहे.
- या महलात दिशा, नकाशा, प्रांगण, प्रकाश, वायुप्रवाह, जलस्रोत आणि पर्यावरणीय घटक यांचा समतोल राखलेला आहे. विशेषतः, महलाच्या मध्यभागी असलेले ब्रह्मस्थान, जाळीदार खिडक्या, ऊंच छत, उंच बरामदे आणि नदीसंपर्क यामुळे मानवी आरोग्य, मानसिक संतुलन आणि सकारात्मक ऊर्जा कायम राहते.
- महलात  हिंदू-मुगल स्थापत्यशैलींचा संगम आहे, ज्यामुळे ऊर्जा प्रवाह, सौंदर्य व शाश्वतता यांचा अद्वितीय संतुलन साधले गेले आहे.
- जहांगीर महल आधुनिक वास्तुनियोजनासाठी प्रेरणादायी आहे.
- आजच्या काळात, शाश्वत व पर्यावरणपूरक वास्तुशास्त्रावर संशोधन करताना या महलाचा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरतो.
- महल पर्यटन, सांस्कृतिक अभ्यास, वारसा संवर्धन आणि वास्तुशास्त्रीय शिक्षणासाठी एक आदर्श अभ्यासविषय ठरतो
- जहांगीर महलाच्या माध्यमातून भारतीय स्थापत्य व वास्तुशास्त्राची श्रेष्ठ परंपरा, सौंदर्य, संतुलन आणि शाश्वतता स्पष्ट होते.
- जहांगीर महलाचे महत्त्व ऐतिहासिक, वास्तुशास्त्रीय आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अतुलनीय आहे.

## संदर्भ सूची

१. ब्राउन, पर्सी, इंडियन आर्किटेक्चर (इस्लामिक कालखंड), बॉम्बे.
२. नाथ, आर., मुगल स्थापत्याचा इतिहास, दिल्ली.
३. आचार्य, पि. के., मानसारानुसार भारतीय स्थापत्य, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
४. चक्रवर्ती, डी. के., भारतीय स्थापत्य सिद्धांत, नवी दिल्ली.
५. पारंपरिक वास्तुशास्त्र ग्रंथ, वास्तुशास्त्र.
६. मध्य प्रदेश पर्यटन विभाग, ओरछा वारसा प्रकाशने.
७. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, ओरछा स्मारक अहवाल.
८. गुप्ता, एस. के., हिंदू-मुगल स्थापत्याचे सौंदर्य आणि तत्त्व, नवी दिल्ली.
९. शर्मा, र., भारतीय स्थापत्य व पर्यावरण संतुलन, जयपूर.